महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्रकाशगड, २रा माळा, प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६४७४२११ विस्तारीत - ३६४२ दूरभाष : २६५८ १५१६
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

संदर्भ : सांनिसु/जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/१७७-B/

## महानिर्मिती २५०० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारणार...
## आराखडा निश्चितीसाठी महानिर्मितीची कार्यशाळा संपन्न

**मुंबई (१९/१०/२०१५) :** "राज्याच्या एकूण वीजनिर्मितीपैकी अपारंपारिक उर्जेचे केवळ अनिवार्य प्रमाण (RPO) राखण्यासाठीच नव्हे, तर राज्यात मोठ्या प्रमाणात सौर उर्जा प्रकल्प उभारणीसाठी अद्यापही असलेला वाव लक्षात घेऊन राज्य शासनाने सौर वीजनिर्मितीचे महत्वाकांक्षी नियोजन केले आहे. त्यासाठीचा सर्वंकष आराखडा बनविण्यासाठी अशा विशेष कार्यशाळेचे आयोजन खूप महत्वपूर्ण ठरणार आहे", असे प्रतिपादन राज्याचे प्रधान सचिव (उर्जा) मा.श्री. मुकेश खुल्लर यांनी केले. २५०० मेगावॅट क्षमतेचे फोटो व्होल्टाईक तंत्रज्ञानावर आधारित सौर प्रकल्प उभारणीच्या कार्यक्रमाची कार्यपध्दती व त्यानुसार जलद अंमलबजावणी करणेसाठीचा आराखडा बनविण्यासाठी महानिर्मितीने आज मुंबई येथे आयोजित केलेल्या कार्यशाळेत ते बोलत होते.

या कार्यशाळेस व्यासपीठावर महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी, संचालक (प्रकल्प) श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक (संचलन) श्री. विजय सिंह, म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक, संचालक (वित्त) श्री. जयकुमार श्रीनिवासन, महापारेषणचे संचालक श्री. ओमप्रकाश येम्पाल, श्री. चव्हाण उपस्थित होते.

सौर प्रकल्पांसाठीचे भूसंपादन, वीज वहन यंत्रणा उभारणीचा खर्च, वीज खरेदी करार, महानिर्मितीचे भाग-भांडवल तसेच निश्चित वीजदर, महसुली परताव्याची हमी, ग्रीडची उपलब्धता, सौर प्रकल्पांचा भारांक इ. विविध तांत्रिकी तसेच वित्तीय मुद्यांवर या कार्यशाळेत विशेषत: सौर उर्जा क्षेत्रातील सर्व संबंधित तज्ज्ञांनी उपस्थित केलेल्या विविध शंकाकुशंकांवर या कार्यशाळेत साधकबाधक विचारविमर्श झाला. त्या सर्व सूचनांची व मुद्यांची दखल घेऊनच आगामी काळात सौर प्रकल्प उभारणीची पुढील रुपरेषा व आराखडा महानिर्मितीतर्फे ठरविण्यात येणार असल्याचे श्री. बिपीन श्रीमाळी यांनी जाहीर केले.

महाराष्ट्र शासनाच्या अपारंपारिक उर्जाविषयक धोरण - २०१५ नुसारच्या एकूण १४४०० मेगावॅट क्षमतावाढीपैकी ७५०० मेगावॅट क्षमतावाढ ही सौर उर्जाप्रकल्पांच्या माध्यमातून आगामी पाच वर्षात साध्य केली जाणार आहे. या ७५०० मेगावॅट सौर उर्जेपैकी २५०० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प महानिर्मितीतर्फे सार्वजनिक उपक्रम-खाजगी कंपन्या यांच्या संयुक्त सहभागातून उभारण्यात येणार आहे. त्यासाठी महानिर्मितीने मे. जेनसोल या सल्लागार कंपनीची नेमणूक केली असून त्यांचेतर्फे श्री. अनमोल जग्गी यांनी या कार्यशाळेत सविस्तर सादरीकरण केले.

या नव्या सौर प्रकल्पांद्वारे उत्पादित होणारी महानिर्मितीची संपूर्ण २५०० मेगावॅट क्षमतेची वीज ही महावितरणला देण्यात येणार असून या विजेच्या वहन व पारेषण यासाठी देखील योग्य ती पुरेशी पायाभुत सुविधा उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. या २५०० मेगावॅट क्षमतावाढीसाठी सुमारे १५,००० कोटी रुपये इतकी गुंतवणूक अपेक्षित असून त्यासाठी सुमारे १२,५०० एकर जमिनीची आवश्यकता असणार आहे.

तसेच यापैकी २५० मेगावॅट क्षमता ही कॅनॉल टॉप - कॅनॉल बँक यासारख्या नावीन्यपूर्ण संकल्पनावर आधारित सौर प्रकल्पासाठी राखीव असणार आहे. देशी सौर उपकरणे उत्पादकांना चालना मिळण्यासाठीदेखील या आराखड्यात योग्य ते नियोजन करण्यात येणार आहे.

महानिर्मितीची सध्याची सौर उर्जा क्षमता १८० मेगावॅट असून त्या शिवाजीनगर, साक्री येथील १२५ मेगावॅटचा आशियातील महाकाय प्रकल्प व शिर्सुफळ येथील ५० मेगावॅट प्रकल्प तसेच चंद्रपूर येथील ५ मेगावॅट या सौर प्रकल्पांचा समावेश आहे.

या कार्यशाळेचे सूत्रसंचालन सौ. स्वाती फोले यांनी तर आभारप्रदर्शन उप मुख्य अभियंता (सौर) श्री. किरण माथुरकर यांनी केले. सदर कार्यशाळेस एस.ई.सी.आय. सहित विविध वीजकंपन्यांचे प्रतिनिधी, देशविदेशातील सौर उर्जा उपकरणे उत्पादक, गुंतवणूकदार व विविध वित्तीय संस्थांचे सुमारे १५० प्रतिनिधी उपस्थित होते.

---

दिनांक : १९/१०/२०१५.

प्रति,
**मा. संपादक,**
**दैनिक / वृत्तवाहिनी**

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय देनिकाच्या सर्व आवृत्तींत / वाहिनीवर प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह !

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**

D:\gawathe sandip\Data Bank\CPC\2015\SOLAR - RANGSHARADA - WORKSHOP PROGRAMME - 19.10.2015\Press Note - Solar Workshop - Marathi - 20.10.2015.doc